# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.10.2024** **वार – शुक्रवार**

---

**फडणवीस**

पुण्यातील नवीन पोलीस आयुक्तालयाच्या इमारतीचं भूमिपूजन आज झालं. तसंच पुणे शहरातील सात नवीन पोलीस ठण्यांचं उद्घाटनही झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यात माध्यमांशी बोलताना दिली. पुण्यात आंबेगाव, नांदेड सिटी, बाणेर, खराडी, वाघोली, काळेपडल आणि फुरसुंगी या नवीन पोलीस ठाण्यांचं तसंच पिंपरी चिंचवडमध्ये चार पोलीस ठाण्याच उद्घाटन आज झालं. पुणे शहरात 2 हजार 600 नवीन सीसीटिव्ही कॅमेरे बसवण्यात येत आहेत; तसंच न्याय वैद्यक विभागाच्या संगणकीकरणाचा प्रारंभही आज झाला. पिंपरी चिंचवडला नवीन आयुक्तालय उभारण्यासाठी ५० एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली असून त्याचं बांधकामही लवकरच सुरू होईल असं फडणवीस यांनी सांगितलं.

**ऊस गाळ हंगाम**

राज्यातील यंदाचा ऊस गाळप हंगाम १५ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. जे साखर कारखाने गाळप हंगाम १५ नोव्हेंबरपूर्वी सुरू करतील अशा कारखान्यांच्या अध्यक्ष आणि कार्यकारी संचालकांवर गुन्हे दाखल करण्याची कारवाई करण्याचा इशारा साखर आयुक्त डॉक्टर कुणार खेमनार यांनी दिला आहे.

**pcmc**

चिंचवड महानगरपालिकेच्या कर संकलन विभागाने आतापर्यंत ५०८ कोटीं रुपयांचा मालमत्ता कर जमा केला आहे. विविध सवलतींचा लाभ घेऊन सुमारे चार लाख नागरिकांनी मालमत्ता कराचा भरणा केला आहे. परंतु अजूनही कर न भरलेल्या मालमत्ताधारकांना १ ऑक्टोबरपासून २ टक्क्यांचं विलंब शुल्क लागू झालं आहे. संबंधित नागरिकांनी मालमत्ता कर त्वरित भरावा असं आवाहन कर संकलन विभागाचे सहाय्यक आयुक्त अविनाश शिंदे यांनी केलं आहे.

**पीएमपीएमएल**

पीएमपीएमएलनं सुरू केलेल्या पर्यटन बससेवेमध्ये आता कोरेगांव भिमा विजयस्तंभाचाही समावेश करण्यात आला आहे. पर्यटन बस क्रमांक सहामध्ये वाडेबोल्हाई मंदिर, तुळापूर, रांजणगांव गणपती मंदिर यासह आता कोरेगांव भिमा विजयस्तंभाचाही समावेश करण्यात आल्याची माहिती पीएमपी प्रशासनाकडून देण्यात आली. प्रत्येक आठवड्याच्या शनिवारी आणि रविवारी परिसरातील पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी पीएमपीतर्फे ही सेवा सुरू करण्यात आली आहे.

**नदी सुधार प्रकल्प**

पुण्यात राबवण्यात येत असलेल्या मुळा-मुठा नदी सुधार प्रकल्पात वाकड बायपास ते सांगवी पुल या दरम्यान सुमारे ८ किलोमीटरचा समावेश आहे. यातील डावीकडची बाजू पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीत आणि उजवीकडील बाजू ही पुणे महापालिका हद्दीत येत आहे. या कामासाठीच्या २९७ कोटी रुपयांच्या निविदेला पुणे महापालिकेच्या स्थायी समितीमध्ये काल

मंजुरी देण्यात आली. महंमदवाडीमधील सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्त्वावरील रस्त्याच्या 75 कोटी रुपयांच्या प्रस्तावालाही मंजुरी देण्यात आली आहे.

**रावण दहन**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरामध्ये दरवर्षी दसऱ्याला रावण दहन उत्सव उत्साहाने साजरा केला जातो. या ठिकाणी नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दीही होते. अशा सर्व ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टिने आयोजकांनी करायच्या उपाय योजनांबाबत अग्निशमन विभागानं नियमावली जाहीर केली आहे. ज्वलनशील वस्तूच्या बाजूला रावण दहन करू नये, मंडपात एल ई डी दिव्यांचा वापर करावा, मूर्तीची उंची महापालिकेने घालून दिलेल्या नियमात असावी, कार्यक्रमस्थळी पाणी, वाळू यांचा मुबलक साठा करावा असे निर्देश पालिका प्रशासनाने दिले आहेत.

**ससून**

पुण्यातील ससून रूग्णालयात मूत्रपिंड प्रत्यारोपणाची ३३वी प्रक्रिया यशस्वीपणे पार पडल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी दिली. हडपसर इथल्या रूग्णाचं मूत्रपिंड प्रत्यारोपण करण्यात आलं.

**बीसी जीलसीकरण**

क्षयरोग प्रतिबंधासाठी बीसीजी लस प्रभावी ठरत असल्याने राज्यात १८ वर्षावरील ८० लाख नागरिकांना बीसीजी लस दिली जात आहे. राष्ट्रीय क्षयरोग दूरीकरण कार्यक्रमातंर्गत २०२५पर्यंत संपूर्ण देश क्षयरोगमुक्त करण्याचा केंद्र शासनाचा संकल्प आहे. त्यानुसार राज्यात हा लसीकरण कार्यक्रम राबवला जात आहे.

**ॲटोरिक्षा**

राज्यातील ॲटोरिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी धारकांसाठी ‘धर्मवीर आनंद दिघे कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. एकाच  कुटूंबातील चार व्यक्तींना या योजनेचा लाभ घेता येईल. योजनेच्या अधिक माहितीसाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयात कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या  योजनेचा लाभ घ्यावा असं आवाहन पुण्याच्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांनी केलं आहे.

**टेबल टेनिस**

सांगलीमध्ये सुरू असलेल्या राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत पुण्याच्या खेळाडूंची घोडदौड कायम आहे. महिलांच्या गटात समृद्धी कुलकर्णी, तर पुरुषांच्या गटातील नील मुळे आणि जय पेंडसे यांनी आपापल्या प्रतिस्पर्ध्यावर मात करत विजयी आगेकूच कायम राखली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या ढगाळ हवामान असेल, हलक्या पावसाचीही शक्यता असून कमाल तापमान 32 अंश सेल्सियसच्या आसपास राहील असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**